# महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

## विधान भवन, मुंबई येथे आयोजित करण्यात येणाऱ्या कार्यक्रम प्रसंगी खाद्यपेय पुरविण्याकरिता खाद्यपेय प्रबंधकाची (कॅटरर्सची) नियुक्ती संदर्भात.

विधान भवन, मुंबई येथे मा.पीठासीन अधिकारी, जनसंपर्क कक्ष, वि.स.पागे संसदीय प्रशिक्षण केंद्र तसेच या सचिवालयातील इतर कक्षांमार्फत देखील विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. कार्यक्रम प्रसंगी उपस्थित राहणाऱ्या मान्यवरांना अल्पोपहार, चहा, भोजन, इत्यादी पुरविण्याबाबत वरिष्ठांकडून निदेशित करण्यात येते. अशावेळी कार्यक्रम प्रसंगी उपस्थित असलेल्या मान्यवरांना आवश्यकतेनुसार अल्पोपहार, चहा, भोजन इत्यादी पुरविण्याकरिता पुरवठादार/ ठेकेदारांकडून दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

सदर कामाकरिता इच्छुक पुरवठादार/ठेकेदारांनी आपले दरपत्रक मोहरबंद पाकीटातून सचिव-१ (कार्यभार), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई या पत्त्यावर दिनांक ०५ सप्टेंबर, २०२४ रोजी किंवा तत्पूर्वी सायंकाळी ०४.०० वाजेपर्यंत पाठविण्यात यावे. दरपत्रक स्वीकृत झाल्यास त्यानुसार आपणास कळविण्यात येईल. मात्र कोणतेही दरपत्रक स्विकृत अथवा अस्विकृत करण्याचा अधिकार या सचिवालयाने राखून ठेवला आहे. कृपया यांची नोंद घ्यावी, ही विनंती.

**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,**
**विधान भवन, मुंबई.**